# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.06.2025** **वारःरविवार**

---

•आपत्ती प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी पंतप्रधानांकडून प्रमुख जागतिक प्राधान्यक्रमांची रूपरेषा
•केंद्र सरकारच्या अकरा वर्षांच्या कारकिर्दीत देशात उल्लेखनीय परिवर्तन
•साखरेच्या अतिरिक्त उत्पादनातून इथेनॉलची निर्मिती झाली, त्याचप्रमाणं प्लास्टिकचं नैसर्गिकरित्या विघटन होणं गरजेचं – मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
आणि
•फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत अमेरिकी टेनिसपटू कोको गॉफला विजेतेपद

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपत्ती प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी प्रमुख जागतिक प्राधान्यक्रमांची रूपरेषा मांडली. यामध्ये नाविन्यपूर्ण वित्तपुरवठा तसंच पूर्वसूचना प्रणाली आणि समन्वय मजबूत करणं या गोष्टींचा समाविष्ट आहे. काल व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सीडीआरआय २०२५ अर्थात आपत्ती प्रतिकारशक्ती पायाभूत सुविधांवरील आंतरराष्ट्रीय परिषदेला संबोधित करताना, मोदी यांनी विकासात लवचिकतेची गरज अधोरेखित करून, नैसर्गिक आपत्तीच्या काळात टिकून राहणाऱ्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीचं आवाहन केलं.
नैसर्गिक आपत्ती आणि हवामान बदलाच्या दृष्टीनं किनारी प्रदेश आणि बेटांची असुरक्षितता त्यांनी अधोरेखित केली. पंतप्रधानांनी प्रशांत हिंद महासागर आणि कॅरिबियन प्रदेशातील प्रतिनिधींच्या उपस्थितीबद्दल कौतुक करून आफ्रिकन संघाच्या सहभागाचं स्वागत केलं.

**डेव्हिड-लॅमी**

ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री डेव्हिड लॅमी यांनी काल नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. भारत-ब्रिटन द्विपक्षीय संबंधांमधील प्रगतीचं स्वागत करून मोदींनी वाढत्या व्यापक धोरणात्मक भागीदारीबद्दल समाधान व्यक्त केलं. तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमांतर्गत सुरू असलेल्या सहकार्याचं स्वागत करून विश्वासार्ह आणि सुरक्षित नवोपक्रम परिसंस्था घडवण्याच्या क्षमतेचा उल्लेख मोदींनी यावेळी केला. परराष्ट्र मंत्री डेव्हिड लॅमी यांनी व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, तंत्रज्ञान नवोपक्रम आणि स्वच्छ ऊर्जा यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य आणखी वाढविण्यात ब्रिटनला स्वारस्य असल्याचा उल्लेख केला. मुक्त व्यापार करारामुळं दोन्ही देशांसाठी नवीन आर्थिक संधी उपलब्ध होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. उभय नेत्यांनी प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय केला. लॅमी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला तसंच सीमापार दहशतवादाविरुद्ध भारताच्या

लढाईला पाठिंबा दर्शविला. पंतप्रधान मोदींनी दहशतवादाविरुद्ध आणि त्याला पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध निर्णायक आंतरराष्ट्रीय कारवाईची गरज अधोरेखित केली.

**<u>सुशासन</u>**

**<u>इंट्रो</u>**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं भारतानं गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. गेल्या ११ वर्षात प्रमुख क्षेत्रांमध्ये सरकारनं केलेल्या प्रयत्नांवर आकाशवाणी न्यूज एक विशेष लेख तुमच्यासाठी घेऊन येत आहे. यामध्ये आज, राहणीमानाची सुलभता हा विषय आहे - सुधारणा आणि उपक्रमांमुळं प्रत्येक नागरिकाचं दैनंदिन जीवन सोपं, अधिक सुरक्षित आणि अधिक सन्माननीय बनलं आहे, त्यावर आधारित हा वृत्तांत, माझे सहकारी मनोज क्षीरसागर यांच्याकडून...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

गेल्या दशकात मध्यमवर्गीयांचं दैनंदिन जीवन सुधारणं हा प्रशासनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. गृहनिर्माण आणि आरोग्यसेवेपासून ते शहरी गतिशीलता आणि डिजिटल सुविधांपर्यंत, सरकारनं मध्यमवर्गाचं जीवन सोपं, अधिक सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर बनवण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत, १ कोटी १६ लाखांहून अधिक घरं मंजूर करण्यात आली आहेत, यातील ९३ लाख घरं आधीच पूर्ण झाली आहेत किंवा हस्तांतरित करण्यात आली आहेत. स्मार्ट सिटीज मिशनने ७ हजार ५४५ मंजूर प्रकल्पांपैकी ९३ टक्क्यांहून अधिक प्रकल्प पूर्ण करून पायाभूत सुविधांमध्ये बदल घडवून आणला आहे.

मेट्रो नेटवर्क एका दशकात चौपट झाले आहे, २०१४ मध्ये हा मार्ग २४८ किलोमीटर होता, २०२५ मध्ये मेट्रो एक हजार किलोमीटरहून अधिक मार्गावर धावते आहे. उडान योजनेखाली सामान्य लोकांसाठी विमान प्रवास परवडणारा आणि सुलभ बनवला आहे, ८८ विमानतळ ६२५ मार्गांनी जोडले आहेत.
प्रधानमंत्री जन आरोग्य योजना जगातील सर्वात मोठ्या सार्वजनिक निधीतून चालणाऱ्या आरोग्य विमा योजनांपैकी एक म्हणून उदयास आली आहे - ४१ कोटींहून अधिक आयुष्मान कार्ड जारी केले आहेत. जन औषधी केंद्रांची संख्या आता १६ हजारांहून अधिक आहे, दर्जेदार औषधं ८० टक्क्यांपर्यंत स्वस्त झाली आहेत आणि जीवनावश्यक औषधं सामान्य नागरिकांच्या आवाक्यात आली आहेत. डिजीलॉकरसारख्या मंचामुळे कागदपत्रांच्या भौतिक प्रती बाळगण्याची किंवा सादर करण्याची गरज कमी झाली आहे. ५२ कोटींहून अधिक वापरकर्त्यांनी यावर साइन अप केलं आहे, यातून या सेवेची उपयुक्तता अधोरेखित होते. ८ कोटींहून अधिक वापरकर्त्यांसह उमंग ॲप २०० हून अधिक विभागांकडून एकाच ठिकाणी सेवा देतं. आता १४१ कोटींहून अधिक नागरिकांना आधार सेवा प्रदान करत आहे, कल्याणकारी वितरण सुलभ तर आर्थिक गळती कमी करत आहे. एकत्रितपणे, हे उपक्रम भारतातील वाढत्या मध्यमवर्गाचं जीवन अभिमानास्पद, सोयींनी युक्त आणि आत्मविश्वासपूर्ण राहील याची खात्री करतात.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>अमित</u>**

मदुराई इथं तमिळनाडू भाजपच्या राज्य गाभा समितीच्या आज होणाऱ्या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा काल रात्री मदुराई इथं पोहोचले. पक्षाच्या राज्य, जिल्हा आणि मंडलस्तरीय पदाधिकाऱ्यांशी ते आज संवाद साधतील. ऐतिहासिक मीनाक्षी अम्मन मंदिरालाही ते भेट देतील. अमित शहा संध्याकाळी ओथाकडाई इथल्या वेलाम्मल ग्लोबल हॉस्पिटल मैदानावर पक्षाच्या प्रमुख बैठकीला संबोधित करण्यासाठी जातील. या मेळाव्यात तामिळनाडूतील राज्य, जिल्हा आणि मंडलस्तरीय भाजप पदाधिकारी सहभागी होतील.

**<u>इंट्रो</u>**

साखरेच्या अतिरिक्त उत्पादनातून इथेनॉलची निर्मिती झाली त्याचप्रमाणं आज प्लास्टिकचं नैसर्गिकरित्या विघटन होणं गरजेचं आहे. याचं तंत्रज्ञानही विकसित झालं तर महाराष्ट्राच्या अर्थकारणाला मोठी चालना मिळेल असं मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात व्यक्त केलं.
प्राज फाउंडेशनचे अध्यक्ष डॉक्टर प्रमोद चौधरी लिखित पैलतीरावरून ...तर असं झालं या पुस्तकाचं प्रकाशन करताना ते बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले...
बाइट -देवेंद्र फडणवीस

यावेळी राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील तसंच भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात जैवविविधता आणि इथेनॉल क्षेत्रात प्राजने दिलेल्या योगदानाचं कौतुक केलं. डॉक्टर प्रमोद चौधरी यांनी आपल्या भाषणात जडणघडण, पर्यावरणासाठी काम करण्याच्या प्रेरणेतून इथेनॉलची झालेली निर्मिती यासह बदलत्या तंत्रज्ञानातील विविध टप्प्यांचा मागोवा घेत या पुस्तकांची संकल्पना विशद केली.

**<u>वंदे-भारत</u>**

उत्तर रेल्वेनं कटरा आणि श्रीनगर दरम्यान वंदे भारत गाड्यांचं व्यावसायिक परिवहन सुरू केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ६ जून रोजी कटरा इथून हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केलेली वंदे भारत एक्सप्रेस ही गाडी काश्मीरला लोहमार्गानं देशाच्या इतर भागाशी जोडते. काल संध्याकाळपर्यंत गाड्या त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचुन व्यावसायिक कामकाजाचा पहिला दिवस सुरळीत पार पडला. उत्तर रेल्वेनं दिलेल्या माहितीनुसार, कटरा आणि श्रीनगर दरम्यान दिवसभरात दोन वंदे भारत ट्रेन संचांनी चार फेऱ्या केल्या. गाडीमध्ये चेअर कार आणि एक्झिक्युटिव्ह क्लास असे दोन वर्ग असून त्यांच्या तिकिटांची किंमत अनुक्रमे ७१५ रुपये आणि तेराशे २० रुपये आहे.

**<u>ईद</u>**

राज्यभरात काल ईद ऊल अजहा अर्थात बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवांकडून ठिकठिकाणच्या मशिदींमध्ये सामूहिक नमाज पठण करण्यात आलं. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी ईदनिमित्त काल देशाला शुभेच्छा दिल्या.

**<u>फ्रेंच-खुली-स्पर्धा</u>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत, अमेरिकी टेनिसपटू कोको गॉफनं काल रात्री झालेल्या रोमांचक अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाची बेलारूसची खेळाडू आर्यना सबालेंकाचा ६-७, ६-२, ६-४ असा पराभव केला. २०१८ च्या ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेनंतर जागतिक क्रमवारीत अव्वल दोन महिला ग्रँड स्लॅम अंतिम फेरीत आमनेसामने आल्याची ही पहिलीच वेळ आहे. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या गॉफचे हे दुसरं ग्रँड स्लॅम विजेतेपद आणि क्ले कोर्टवरील तिचा पहिला मोठा विजय आहे. २००२ मध्ये सेरेना विल्यम्सने ही कामगिरी केल्यानंतर गॉफ फ्रेंच ओपन आणि यूएस ओपन महिला एकेरी दोन्ही विजेतेपदे जिंकणारी सर्वात तरुण खेळाडू ठरली.

पुरुषांच्या अंतिम फेरीत गतविजेता कार्लोस अल्काराझ आज जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या जॅनिक सिनरशी सामना करेल. उपांत्य फेरीत अल्काराझविरुद्ध लोरेन्झो मुसेट्टीला पायाच्या दुखापतीमुळं सामन्यातून निवृत्ती घ्यावी लागली, तर सिनरनं नोवाक जोकोविचचा सरळ सेटमध्ये पराभव केला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**